ePaper
| वर्ष - 8 । अंक -78 | UDYAM-MH-26-0158827 |

# विकासकामे उरकली मात्र बिले थकली, कंत्राटदारांचा आंदोलनाचा इशारा



महाईन्यूज TM
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 25 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- गावसकरांकडून भूखंड काढून घेतला?
- बासितने पाकिस्तान बोर्डाला फटकारले
- लाडूच्या विक्रीवर परिणाम नाही
- सिद्धरामय्यांच्या अडचणीत वाढ

### आमदार महेश लांडगे यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

# भामा आसखेड प्रकल्प प्रगतीपथावर!

## महापालिका प्रशासनाचा दावा : पिंपरी-चिंचवडकरांना मुबलक पाणी मिळणार!



। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरामध्ये वाढते औद्योगीकरण, नागरीकरण व वाढत्या शहरीकरणामुळे लोकसंख्या वाढत आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील आधुनिक सोयी-सुविधांमुळे शहरामध्ये वास्तव्य करण्यासाठी नागरिकांचा कल वाढल्यामुळे येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाणीक्षमतेमध्ये वाढ करणे क्रमप्राप्त ठरले आहे.**

यासाठीच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने भामा आसखेड धरण पाणीपुरवठा योजनेमध्ये अंतर्भाव असलेले विविध प्रकल्प जसे की, अशुद्ध जल उपसा केंद्र, १७०० मिलिमीटर व्यासाची ७.३० कि.मी असलेली रायझिंग मेन, ब्रेक प्रेशर टँकची बांधणी, १४०० मि.मी. व्यासाची १८.८० किलोमीटरची ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी, चिखली येथील नियोजित २०० द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र अशा प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर असून या माध्यमातून शहरास वाढत्या लोकसंख्येचा विचार करता मुबलक पाणी मिळणार आहे, असे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### अशुद्ध जलउपसा केंद्राचे 65 टक्के काम पूर्णत्वास

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या अशुद्ध उपसा केंद्र मौजे वाकी तर्फे वाडा येथे बांधण्याचे काम ६५ टक्के पूर्ण झाले आहे. अशुद्ध उपसा केंद्राच्या माध्यमातून शहरासाठी प्रतिदिन १६७ द.ल.लि. इतके पाणी उपलब्ध होणार असून उर्वरित काम प्रगतिपथावर असल्याचे पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### 2.80 किमी लांब 1700 मि.मी. व्यासाची रायझिंग मेन जलवाहिनी पूर्ण

मौजे वाकी तर्फे वाडा येथील अशुद्ध जल उपसा केंद्रापासून ते मौजे तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँक पर्यंत ७.३० किलोमीटरची १७०० मि.मी. व्यासाची रायझिंग मेन जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यापैकी, २.८० किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. याबरोबरच, उर्वरित जलवाहिनीच्या कामाची कार्यवाही सुरू असून उर्वरित काम प्रगतिपथावर आहे.

### ब्रेक प्रेशर टँक बांधणीपूर्वीचे आवश्यक काम पूर्ण

भामा आसखेड अशुद्ध जलउपसा केंद्रातून पाणी उपसा करून १७०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीमधून मौजे तळेगाव येथील नियोजित ब्रेक प्रेशर टँकपर्यंत आणण्यात येणार आहे. नियोजित ब्रेक प्रेशर टँक बांधणीपूर्वीचे अत्यावश्यक काम जसे की, माती परीक्षण, जीऐ ड्रॉईंग, स्ट्रक्चरल डिझाईन ड्रॉईंग आदी कामे पूर्णत्वास आली असून नजीकच्या काळात प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होणार आहे.

### 8.40 किमीची ग्रॅव्हिटी मेन जलवाहिनी पूर्ण

तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँक पासून चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी नेण्यासाठी १८.८० किलोमीटर लांबीची १४०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यानंतर ते पाणी चिखली जलशुद्धीकरण केंद्रामध्ये शुद्ध करून पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. एकूण १८.८० किलोमीटर जलवाहिनीच्या लांबीपैकी ८.४० किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. त्याबरोबरच, भामा आसखेड धरणातून मिळणाऱ्या १६७ द.ल.लि. पाण्यासाठी नियोजित २०० द.ल.लि. प्रतिदिनी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र चिखली येथे बांधण्याचे काम सुरू असून हायड्रॉलिक, जीऐ ड्रॉईंग, स्ट्रक्चरल डिझाईन ड्रॉईंग तपासून घेण्याचे काम सुरू आहे.

> पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील नागरिकांना मुबलक पाणी मिळावे यासाठी महापालिकेकडून विविध प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेच्या प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून नियोजित वेळेपर्यंत प्रकल्प पूर्ण होऊन नागरिकांना मुबलक पाणी मिळणार आहे. नागरिकांना मुबलक पाणी देण्यासाठी महापालिका सदैव तत्पर असून प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू आहे.
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

> भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेमधील अशुद्ध जलउपसा केंद्राचे काम ६५ टक्के पूर्ण झाले असून काही प्रकल्पाचे कामही जलद गतीने सुरू आहे. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत असून प्रकल्प पूर्ण होण्यासाठी असणाऱ्या नियोजित वेळेमध्ये योजनेतील विविध प्रकल्प पूर्ण होणार आहेत. त्यासाठी महापालिकेकडून वेळोवेळी पाठपुरावाही करण्यात येत आहे.
> **– प्रदीप जांभळे-पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# मोदींच्या सभेवर पावसाचे सावट?

## मोदी यांची एस. पी. महाविद्यालयाच्या मैदानावर जाहीर सभा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गुरुवारी (२६ सप्टेंबर) एस. पी. महाविद्यालयाच्या मैदानावर जाहीर सभा होणार आहे. त्यासाठी मैदानावर तयारी सुरू आहे. पण, मंगळवारी झालेल्या पावसामुळे मैदानावर चिखल झाला आहे. चिखल झालेल्या ठिकाणी उत्खनकाच्या मदतीने मुरून टाकला जात आहे. पुढील दोन दिवस म्हणजे बुधवारी, गुरुवारीही मुसळधार पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे सभेच्या ठिकाणी त्यादृष्टीने तयारी सुरू आहे.**



पण, मोदींच्या सभेवर पावसाचे सावट आहे. पावसाचा जोर वाढल्यास लोकांच्या उपस्थितीवर परिणाम होणार आहे.शहर आणि उपनगरात सलग दुसऱ्या वादळी वारे, मेघगर्जनेसह मुसळधार पावसाने हजेरी लावली. भर दुपारीच जोरदार पाऊस झाल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. कमी काळात मुसळधार पाऊस झाल्यामुळे रस्ते जलमय होऊन वाहन चालकांची तारांबळ उडाली. पुणे शहर आणि उपनगरात सलग दोन दिवसांपासून वादळी वारे, मेघगर्जनेसह दमदार पाऊस होत आहे. अचानक होणाऱ्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडत आहे. मंगळवारी सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारपर्यंत तापमानात वाढ झाली होती. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास मेघगर्जनेसह झालेल्या पावसामुळे शहरातील अनेक ठिकाणे जलमय झाली होती. सखल भागात साचलेल्या पाण्यातून दुचाकी वाहने चालविताना कसरत करावी लागत होती. शहराच्या विविध भागात मेट्रो, उड्डाणपुलाची कामे सुरू आहेत. त्यामुळे अगोदरच होत असलेल्या वाहतूक कोंडीत पावसामुळे भर पडली. वाहतूक संथगतीने सुरू होती. सायंकाळी साठेआठपर्यंत शिवाजीनगरमध्ये १९.२, लोहगाव ३९.६, चिंचवड ११.५, लवळे १७.५ आणि मगरपट्ट्यात १२.० मिलिमीटर पाऊस झाला.हवामान विभागाने बुधवारी (२५ सप्टेंबर) पुणे जिल्ह्याला लाल इशारा दिला आहे. जिल्ह्याच्या घाट परिसरात पावसाचा जोर राहणार आहे. शहर आणि उपनगरातही मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. प्रामुख्याने शहरात दिवसभर ढगाळ वातावरण राहून वादळी वारे, मेघगर्जनेसह मध्यम ते मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.मुंबई शहर आणि उपनगरात सोमवारी (२३ सप्टेंबर) रात्रीपासून पावसाचा जोर आहे. सोमवारी रात्री आणि मंगळवारी पहाटे पावसाने झोडपून काढले. मंगळवारी सकाळी साडेआठ वाजता संपलेल्या २४ तासांत डहाणूत ५७.७, हर्णेत ३२.२, कुलाब्यात १५.८, सांताक्रुजमध्ये ७५.१ आणि रत्नागिरीत २४.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने संपूर्ण किनारपट्टीवर पुढील चार दिवस पावसाचा जोर कायम राहण्याचा इशारा दिला आहे. आणि पश्चिम घाटाच्या परिसरात पावसाचा जोर आहे. मागील २४ तासांत सांताक्रुजमध्ये ७५.१, डहाणूत ५७.७, सोलापुरात ८२ आणि कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा येथे १९० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे

### शहरात 24 तासांत 82 मिमी पाऊस

पुणे शहर आणि उपनगरात दोन दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह होत असलेल्या पावसामुळे काही क्षणांत पाणी पाणी होत आहे. मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास शहरात झालेल्या पावसामुळे दाणादाण उडाली. कोल्हापूरसह जिल्ह्यात सलग दोन दिवस पाऊस होत आहे. जोरदार पाऊस झाल्याने नदी-नाले, ओढे, बंधारे, पाझर तलाव ओसंडून वाहत आहेत. गगनबावडा तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस झाला. मागील २४ तासांत १९० मिमी पावसाची नोंद झाली आहे. भुईबावडा घाटात दरड कोसळल्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे. सोलापूर शहरात २४ तासांत ८२ मिमी पाऊस झाला.

# प्राथमिक शिक्षक उद्या आंदोलनासाठी रजेवर

## राज्यभरातील शिक्षक रजा घेऊन आंदोलन करणार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती, विद्यार्थ्यांना गणवेश न मिळणे, अध्यापन सोडून करावी लागणारी प्रशासकीय कामे अशा विविध मुद्द्यांवर राज्यभरातील शिक्षक आज (२५ सप्टेंबर) रजा घेऊन आंदोलन करणार आहेत.**

त्या अंतर्गत शिक्षक संघटनातर्फे राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यामुळे काही ठिकाणी शाळा बंद राहण्याची शक्यता आहे.शालेय शिक्षण विभागाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील शालेय शिक्षणावर विपरित परिणाम होणार असल्याची शिक्षक संघटनांची भूमिका आहे. त्यामुळे शिक्षण विभागाच्या निर्णयांविरोधात प्राथमिक शिक्षकांची काही दिवसांपूर्वी पुण्यात बैठक झाली. त्यात शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असलेले व्हॉट्सअॅप समूह सोडणे, काळी फीत लावून काम करणे अशाप्रकारे विरोध दर्शवण्यात आला. त्यानंतर आता रजा घेऊन



जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला जाणार आहे.कमी पटाच्या शाळांवर तात्पुरत्या शिक्षकांची नियुक्ती, पुढे त्या शिक्षकालाही काढून टाकल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार आहे. शाळा सुरू होऊन तीन महिन्यांनंतरही कित्येक विद्यार्थी गणवेशाविना आहेत. मिळालेले गणवेश विद्यार्थ्यांच्या मापाचे नाहीत, अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसायला बाके नाहीत, काही ठिकाणी पुस्तकेही पोहोचलेली नाहीत, शाळांच्या इमारतींची दुरवस्था आहे. शाळेत पोषण आहारात रोज वेगवेगळे पदार्थ द्यायला सांगून त्यासाठी आवश्यक अनुदान दिले जात नाही. शिक्षकांना शिकवायची इच्छा असताना कागदपत्रे तयार करणे, ऑनलाइन बैठका, सातत्याने माहिती पाठवणे, उपक्रम करण्यात वेळ जातो. त्यामुळे अध्यापनासाठी पुरेसा वेळ देता येत नाही.

### विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार आहे

अशा सर्व अडचणी सोडवून विद्यार्थ्यांना पुरेशा सुविधा, शिक्षकांना वेळ मिळण्याच्या मागणीसाठी शिक्षक संघटनांकडून आंदोलन करण्यात येणार आहे.दरम्यान, शिक्षक संघटनांच्या मागण्या विचारात घेऊन शासनाने बहुतांश मागण्या मान्य केल्या आहेत. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांनी रजा घेऊन आंदोलन करू नये असे आवाहन आहे, असे प्राथमिक शिक्षक संचालक शरद गोसावी यांनी सांगितले.कमी पटाच्या शाळांवर तात्पुरत्या शिक्षकांची नियुक्ती, पुढे त्या शिक्षकालाही काढून टाकल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार आहे शिक्षकांना शिकवायची इच्छा असताना कागदपत्रे तयार करणे, ऑनलाइन बैठका, सातत्याने माहिती पाठवणे, उपक्रम करण्यात वेळ जातो.

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया सुरू

# मोशीतील इंटरनॅशनल मल्टिपर्पज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स ‘दृष्टीक्षेपात’!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा आणखी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून मोशी येथे आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून, निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाला सुरूवात करण्यात येणार आहे.**




भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडला स्पोर्ट्स हब बनवण्याचा संकल्प केला होता. त्याअनुशंगाने विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकूल उभारण्यासाठी त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. त्याला यश मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अंतर्गत मौजे मोशी येथे गट क्र. ४४२ पै. व गट क्र. ४४५ पै मध्ये मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १/२०४ मध्ये स्टेडिअमचे प्रयोजन आहे. सदर ठिकाणी बहुउद्देशीय क्रिडा संकुल उभारण्याबाबत महापालिका सभा क्र. ३९१ मध्ये दि. २५ जुलै २०२३ रोजी मंजूर करण्यात आला होता. प्रस्तावित ठिकाणी ४.५६ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड आरक्षित आहे. त्या ठिकाणी स्टेडिअम होणार आहे.

मुंबईतील बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समधील एक भूखंड महाराष्ट्र क्रिकेट असोशिएन (MCA) मार्फत विकसित करुन चांगल्या प्रकारचा स्पोर्ट्स क्लब शहराला उपलब्ध झाला आहे. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये इंटरनॅशनल मल्टीपर्पज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स विकसित होणार आहे.

या कॉम्प्लेक्समध्ये क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बेसबॉल व जलतरण इत्यादी खेळासाठी व खेळाडुंना चालना मिळणार आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस कायमस्वरुपी मिळकतकर उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्प “बांधा, अर्थपुरवठा करा, चालवा आणि हस्तांतर करा” तत्त्वावर सार्वजनिक खासगी भागीदारीद्वारे (PPP) उभारण्यात येणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा या प्रकल्पावर खर्च होणार नाही.

> “ पिंपरी-चिंचवड शहराला ‘स्पोर्ट्स सिटी’ बनवण्याचा संकल्प आम्ही ‘भोसरी व्हीजन- २०२०’ मध्ये केला होता. त्याअंतर्गत आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्र, आंतराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र, इंटरनॅशनल बॉक्सिंग सेंटर, स्केटिंग ग्राउंड असे विविध प्रकल्प मार्गी लागले आहेत. या पुढील काळात पिंपरी-चिंचवड स्पोर्ट्स क्लब उभारण्याचा मानस आहे. त्याचे नियोजन नेहरुनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडिअममध्ये करण्यात येत आहे. तसेच, मोशी येथे प्रशासनाने आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय क्रीडा संकूलसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रकल्प उभारणी सुरू करावी आणि राज्यातील स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीचीही पायाभरणी करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **–महेश लांडगे,**
>
> - आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# ‘प्रेरणा’च्या माध्यमातून नागरिकांना मदतीचा हात!

## माजी सरपंच सखाराम शिंदे : गडद परिसरातील 110 नागरिकांची तपासणी

। राजगुरूनगर।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रेरणा सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण रोजगारीच्या संधी व ग्रामीण भागातील नागरिकांना मदतीचा हात देवू, असा संकल्प माजी सरपंच सखाराम शिंदे यांनी केला आहे.**




पुणे जिल्ह्यातील सुप्रसिद्ध सामाजिक संस्था प्रेरणा सोशल फाउंडेशन यांनी खेड तालुक्यातील दुर्गम भागात आरोग्य शिबीर घेतले. फौंडेशनच्या संस्थापिका अक्षता शिंदे यांच्या संकल्पनेतून गडद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू तपासणी, गरजूंना मोफत काळे चष्मे वाटप ,मोफत औषधे वाटप, आरोग्य तपासणी असे भव्य आरोग्य शिबीर पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन पुणे जिल्हा दूध उत्पादक संघ कात्रजचे संचालक अरुण चांभारे व खेड पंचायत समितीच्या माजी उपसभापती मंदाताई शिंदे व शिक्षक सहकारी पतसंस्था मा,सभापती प्रभाकर शिंदे यांच्या हस्ते झाले. नि:स्वार्थी, नि:स्पृह भावनेने काम करणाऱ्या युवा सामाजिक कार्यकर्त्या अक्षता वैभव शिंदे यांच्या कार्यामुळे समाजातील असमतोलाची दरी काही अंशी कमी होताना दिसते. समाजमन आणि समाजभान जपणाऱ्या शिंदे यांच्या भावी विधायक कार्यास शुभेच्छा देतो, असे मनोगत चांभारे यांनी यावेळी व्यक्त केले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचा परिसरातील 110 नागरिकांनी लाभ घेतला. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी 25 नागरिकांनी नाव नोंदणी केली.

### फाउंडेशनचे तब्बल 58 उपक्रम...

सरपंच सखाराम शिंदे, शिक्षक सहकारी पतसंस्था मा,सभापती प्रभाकर शिंदे , गडद गावचे सरपंच चंद्रकांत शिंदे, शिवे गावचे सरपंच अक्षय शिवेकर, आंभू गावचे सरपंच ज्ञानदेव कांबळे, विठ्ठल राजगुरव, भागुजी राजगुरव, मारुती तळेकर, संजय शिंदे, मारुती तळेकर यांनी शिबिराला भेट देऊन फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. युवा उद्योजक वैभव शिंदे यांनी प्रस्ताविकात फाउंडेशनच्या ५८ उपक्रमांची माहिती दिली आणि सरतेशेवटी आभार प्रदर्शन केले.

# पुराची चिंता की वादाचा धूर?



## भूमिका

**कोलकातामधील 'आरजी कार' या शासकीय रुग्णालयात शिकाऊ डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येचे प्रकरण ममता बॅनर्जी यांना चांगलेच महागात पडले. या प्रकरणाची चर्चा विरत नाही तोच पश्चिम बंगालच्या सहा जिल्ह्यांमध्ये आलेल्या पुरावरून राजकारण सुरू झाले.**

पुरावरून ममता बॅनर्जी यांनी सारे खापर 'दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन' या यंत्रणेवर फोडले. या केंद्र सरकारच्या उपक्रमाने दामोदर नदीवर तिलैयासह चार धरणे झारखंडमध्ये बांधली असून पश्चिम बंगाल आणि झारखंड या राज्यांत पूर नियंत्रण, सिंचन आणि पाणीपुरवठ्याची कामेही करणाऱ्या या उपक्रमाने पश्चिम बंगाल सरकारला विश्वासात न घेता परस्पर पाच लाख क्युसेक्स पाणी सोडले, असा ममता बॅनर्जी यांचा आरोप आहे. यामुळेच पश्चिम बंगालच्या सहा जिल्ह्यांत पूर आल्याचे बॅनर्जी यांचे म्हणणे आहे. गेल्या दोन दिवसांत पंतप्रधानांकडे दोन पत्रे पाठवून पश्चिम बंगालमधील पूर परिस्थितीला केंद्र सरकारच जबाबदार असल्याचे खापर फोडले आहे. या पुराच्या वेळीच पश्चिम बंगाल सरकारने झारखंडच्या सीमा बंद केल्या आणि वाहतूकही रोखली. सीमा बंद केल्याने मालवाहू वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. जीवनावश्यक



वस्तूंचा पुरवठा बंद झाला. झारखंडची सीमा रोखण्याच्या निर्णयावरून ममता बॅनर्जी यांच्यावर टीका होऊ लागली. त्यावर राज्यात पूर परिस्थिती निर्माण झाल्याने वाहतूक बंद केल्याची सारवासारव पश्चिम बंगाल सरकारने केली असली तरी, लोकांकडून होणारी टीका वाढताच पश्चिम बंगाल सररकारने वाहतूक पूर्ववत करण्यास परवानगी दिली. वास्तविक झारखंडमध्ये 'इंडिया' आघाडीचा घटकपक्ष असलेल्या झारखंड मुक्ती मोर्चाचे सरकार आहे. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना गैरव्यवहारांच्या आरोपांवरून 'ईडी'ने अटक केली होती. केंद्रातील भाजप सरकारकडून तपास यंत्रणांचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप करणाऱ्यांमध्ये ममता बॅनर्जी यांच्याप्रमाणेच हेमंत सोरेन हेही आघाडीवर असतात. भाजपविरोधी आघाडीचा मुख्यमंत्री असताना ममता बॅनर्जी यांनी वाहतूक बंद करून झारखंडचेही नुकसान केले.

अर्थात बॅनर्जींचा खरा रोख केंद्रावर आहे. सर्व संबंधितांशी चर्चा करूनच पाणी सोडण्याचा निर्णय झाल्याचा केंद्रीय जलशक्तीमंत्री सी. आर. पाटील यांचा दावाही ममता बॅनर्जी यांनी खोडून काढला. या पाठोपाठ दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनवरील आपले प्रतिनिधित्व पश्चिम बंगाल सरकार मागे घेत असल्याचे जाहीर केले. त्यानंतर या संस्थेच्या संचालक मंडळावरील पश्चिम बंगालच्या दोन प्रतिनिधींनी राजीनामे दिले.कोलकात्यातील शासकीय रुग्णालयातील महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येमुळे पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या विरोधात जनमत तयार झाले आहे. संदेशखालीपाठोपाठ शासकीय रुग्णालयातील अनास्थेमुळे मुख्यमंत्रीपदी महिला असतानाही राज्यातील महिला सुरक्षित नाहीत, अशी टीका करून भाजपने ममता बॅनर्जीविरोधाचे राजकारण पुढे रेटले. महिला डॉक्टरच्या मृत्यूचे निमित्त करून तर भाजपने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची चांगलीच पंचाईत केली. सर्वोच्च न्यायालयानेही पश्चिम बंगाल सरकारचे कान उपटले. जनमत विरोधात जात असल्याची जाणीव झाल्याने पश्चिम बंगालमधील लोकांसाठी मुख्यमंत्रीपद सोडण्याची माझी तयारी असल्याची भावना व्यक्त करीत लोकांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न ममता बॅनर्जी यांनी केला. आता, महिला डॉक्टरवरून जनमत विरोधी झाल्यानेच त्याच्यावरून लक्ष विचलित करण्याकरिता ममता बॅनर्जी यांनी पुराचे राजकारण सुरू केल्याची टीका विरोधकांकडून केली जाते आहे. स्वत:च्या बचावासाठीच त्यांनी या वादाचा धुरळा उडवल्याचे तृणमूल-विरोधी पक्षीयांचे म्हणणे आहे. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनने १४ सप्टेंबरपासून पुढल्या तीन दिवसांत मिळून पाच लाख क्युसेक्स पाणी सोडले हे खरे, परिणामी पुराची तीव्रता वाढली हेही खरे; पण मुख्य वाद केंद्र सरकारने पूर्वसूचना दिली की नाही हा आहे.

## प्रासंगिक »

### दक्षिणेचा 'वाम'पंथ!

***श्रीलंकेच्या अध्यक्षीय प्रासादाच्या प्रांगणात तंबू ठोकून सरकारचा निषेध करण्यात सहभाग घेणारे अनुरा दिसनायके आता त्याच प्रासादात अधिकृतपणे वास्तव्य करतील...***

आर्थिक आव्हानांनी गांजलेला, संपत्ती निर्मिती आणि तिचे समन्यायी वाटप यात अपयशी ठरलेला समाज अंतिमत: डाव्या विचाराकडे वळतो. मग हा समाज अमेरिकेतील लक्ष्मीपुत्रांच्या 'वॉल स्ट्रीट' यशात वाटा न मिळालेला असो वा एके काळच्या साम्राज्यवादाचे प्रतीक असलेल्या इंग्लंडमधील असो. संपत्तीतील विषमता समाजास डावीकडे वळवतेच वळवते. या सत्याचे ताजे प्रतीक म्हणजे श्रीलंकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत अनुरा कुमारा दिसनायके या आतापर्यंत सत्तास्पर्धेत कधीही गांभीर्याने न घेतल्या गेलेल्या नेत्याचा अनपेक्षित विजय. बंदरनायके, राजपक्षे, गुणवर्धने, जयवर्धने अशा पारंपरिक धन आणि राजदांडग्या घराण्यांचा सहज पराभव करून अनुरा कुमारा दिसनायके अध्यक्षपदी निवडले गेले. ते श्रीलंका-बाह्य जगात अपरिचित आहेत हेच केवळ त्यांच्या विजयाची दखल घेण्याचे कारण नाही.

भारतामध्ये एकात्मिक न्यायव्यवस्था आहे. या व्यवस्थेत उच्च न्यायालयांचे विशेष महत्त्व आहे. ब्रिटिश राजवटीत १८६२ मध्ये मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथे उच्च न्यायालयांची स्थापना झाली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर उच्च न्यायालयांची रचना आणि त्यांचे अधिकारक्षेत्र ठरले.

# या व्यवस्थेत उच्च न्यायालयांचे विशेष महत्त्व आहे

याबाबतच्या तरतुदी २१४ ते २३१ क्रमांकाच्या अनुच्छेदांमध्ये आहेत. या तरतुदींमधून उच्च न्यायालय ही संस्थात्मक रचना समजून घेता येते. राज्यांसाठी उच्च न्यायालये आहेत; मात्र दोन राज्यांसाठी किंवा केंद्रशासित प्रदेशांसाठी सामायिक उच्च न्यायालयेही आहेत. दिल्ली या केंद्रशासित प्रदेशासाठी स्वतंत्र उच्च न्यायालय १९६६ साली अस्तित्वात आले. आजघडीला एकूण २५ उच्च न्यायालये अस्तित्वात आहेत.उच्च न्यायालयांमध्ये मुख्य न्यायमूर्ती आणि इतर न्यायाधीश असतात. एकूण किती न्यायाधीश असावेत, याविषयी संविधानात भाष्य नाही; त्यामुळे राष्ट्रपतींना योग्य वाटेल त्यानुसार न्यायाधीशांची संख्या निर्धारित होते. या न्यायाधीशांची नियुक्तीही राष्ट्रपतींमार्फत होते. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींची नियुक्ती राष्ट्रपती करतात. ही नियुक्ती करताना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि संबंधित राज्यांचे



राज्यपाल यांच्याशी विचारविनिमय केला जात असे. न्यायाधीशांबाबत झालेल्या तीन खटल्यांमधून केवळ सरन्यायाधीशांसोबत विचारविनिमय करण्याऐवजी न्यायवृंदासोबत (कॉलेजियम) चर्चा होणे गरजेचे आहे, हे तत्त्व रूढ झाले. मोदी सरकारने ९९ व्या घटनादुरुस्तीने न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला होता; मात्र ही घटनादुरुस्ती अवैध ठरल्याने न्यायालयाचे स्वातंत्र्य टिकण्यास मदत झाली.उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होण्यासाठी भारतीय नागरिक असण्याबरोबरच उच्च न्यायालयात १० वर्षे वकिलीचा अनुभव असणे किंवा कोणत्याही न्यायिक पदाचा १० वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. या न्यायाधीशांना पदावरून मुक्त करण्याची प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांप्रमाणेच आहे. त्यांना सहज साध्या प्रक्रियेने पदावरून हटवता येत नाही. न्यायाधीश कायदेमंडळाच्या कृपेवर अवलंबून राहू नयेत, त्यांचे स्वातंत्र्य जपले जावे, यासाठीच अशी रचना आखलेली आहे. पदमुक्त होण्याची त्यांच्यावर वेळ आली नाही तर वयाच्या ६२ व्या वर्षांपर्यंत ते काम करू शकतात. न्यायाधीश कार्यकाळाच्या आधीच राष्ट्रपतींकडे राजीनामा सोपवून पदमुक्त होऊ शकतात. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनाही संविधानाची शपथ घ्यावी लागते. भारताचे सार्वभौमत्व टिकावे, कायद्याचे राज्य असावे यासाठीची ही शपथ असते. राज्यपालांच्या उपस्थितीत किंवा राज्यपालांनी नेमून दिलेल्या व्यक्तीच्या उपस्थितीत न्यायाधीशांना ही शपथ घ्यावी लागते. न्यायाधीशांचे वेतन, भत्ते यासाठीचा खर्च राज्याच्या एकत्रित निधीतून होतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विरोधकही एन्काउंटरचं समर्थन करतील

## नाना पटोलेंचं राज्य सरकारला थेट आव्हान!

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बदलापूर शाळा लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या एन्काउंटरनंतर विरोधकांकडून विविध प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. मात्र, असे प्रश्न उपस्थित करून विरोधक आरोपीचं समर्थक करत असल्याचा आरोप सत्ताधाऱ्याकडून करण्यात आला आहे. दरम्यान, या आरोपालाच आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. तसेच या प्रकरणातील एकाला नाही, तर इतर आरोपींनाही अटक करून त्यांचा एन्काउंटर करा, आम्ही त्याचे समर्थन करून असं आव्हानही त्यांनी राज्य सरकारला दिलं आहे. मुंबईत माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.**



"महाराष्ट्रातील सरकार पापी आहे. स्वतःचे पाच दुसऱ्यांवर कसे ढकलायचं हे त्यांना माहिती आहे. हे लोक सगळं ठरवून करत आहेत. आम्ही जे काही बोललो किंवा सोशल मीडियावर पोस्ट केली, ते बघितलं तर अक्षय शिंदेच्या मृत्यूनंतर जे प्रश्न निर्माण झाले, ते फक्त आम्ही विचारले आहेत. सरकार त्यावर उत्तर न देता, पळवापळवीची उत्तर देत आहे. स्वतःचं पाप दुसऱ्यांवर ढकलण्याचा हा प्रकार आहे", अशी टीका नाना पटोले यांनी केली."लोकांना हे सगळं कळतं आहे. अक्षय शिंदेचं समर्थन कोणीही केलेलं नाही, करणारही नाही. खरं तर न्यायालयात संबंधित शाळेसंदर्भात कोणीतरी याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेत या शाळेबद्दल अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहेत. या शाळेत मुलींचे व्हिडिओ बनवले जात होते, अशी देखील माहिती आहे. हे सगळं भयानक आहे, असेही ते म्हणाले. पुढे बोलताना, या प्रकरणातील शाळा ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहे. त्यामुळे तिथल्या संचालक मंडळाला वाचवण्याचा प्रयत्न होतो आहे. या घटनेतील मुख्य आरोपी वेगळे आहेत", असा आरोपही त्यांनी केला."बदलापूरची घटना ही राज्यातील एकमेव घटना नाही. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जिल्ह्यात नागपूरमध्ये यापेक्षा भयंकर घटना घडल्या आहेत. राज्यात महिला अत्याचाराची कीड या सरकारमुळे लागली आहे. त्यामुळे सरकारने आमच्यावर आरोप करण्यापूर्वी स्वत: आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. अक्षय शिंदे मृत्यू प्रकरणाचे समर्थन कुणीही करत नाही. जे प्रश्न उपस्थित होत आहेत, त्याची उत्तरं सरकारे दिली पाहिजे. सरकारने याप्रकरणातील इतर आरोपींनाही अटक केली पाहिजे, सरकारने त्यांचाही एन्काउंटर करावा, आम्ही त्याचे समर्थन करू", असेही ते म्हणाले.बदलापूरमधील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला. अक्षय शिंदे याला पोलीस चौकशीसाठी घेऊन जात असताना त्याने पोलिसांकडील बंदूक हिसकावून घेत पोलिसांवर गोळीबार केल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी घडली. यामध्ये एक पोलीस अधिकारी जखमी झाले. अक्षय शिंदे याने केलेल्या गोळीबारानंतर प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला. पोलिसांच्या गोळीबारात आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला.पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी पोलिसांच्या चकमकीत अक्षय शिंदेच्या मृत्यू प्रकरणासंदर्भात माहिती देताना सांगितलं की, "जी घटना घडली, त्या घटनेची प्राथमिक अशी आहे की, बदलापूर पोलीस ठाण्यात बदलापूर येथील दोन चिमुरड्या विद्यार्थीनीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा गुन्हा अक्षय शिंदेवर दाखल होता.

### शिंदे गटाने विरोधकांना सुनावलं

बदलापूरमधील चिमुकल्या मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे पोलीस चकमकीत ठार झाला आहे. शिंदेने पोलिसांच्या हातातील बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळीबार करत पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ गोळीबार करून अक्षयला ठार केलं. दरम्यान, या चकमकीवरून राज्य सरकार व पोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. काही लोकांनी हे एन्काउंटर खोटं असल्याचे दावे केले आहेत. या प्रकरणातील इतर आरोपींना वाचवण्यासाठी हे खोटं एन्काउंटर घडवून आणलं का?

### तुम्ही बलात्काऱ्याबरोबर आहात ?

संजय निरुपम म्हणाले, मला विरोधी पक्षांची कीव येते, मी त्यांचा निषेध करतो. हेच लोक काही दिवसांपूर्वी म्हणत होते की आरोपीला भर चौकात फाशी द्या आणि आता आम्ही बलात्काऱ्याला मारलं, आमच्या पोलिसांनी त्याचा एनकाउंटर केला, ती प्रवृत्ती नेस्तनाबूत केली तर हेच लोक राजकारण करू लागले आहेत. मला विरोधी पक्षांना विचारायचं आहे की तुम्ही या बलात्काऱ्याबरोबर आहात की त्याला ठार करणाऱ्या पोलिसांबरोबर? पश्चिम बंगालमध्ये अशीच बलात्काराची घटना घडली. मात्र महाराष्ट्रात बलात्काऱ्यावर कारवाई करणारा मुख्यमंत्री आहे तर हेच विरोधक त्या मुख्यमंत्र्यांवर टीका करत आहेत.

---

# अजित पवार महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा

## किती जागा मिळणार? उपमुख्यमंत्र्यांकडून सर्व प्रश्नांची उत्तरं

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यातील सर्वच पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. विविध पक्षांचे नेते राज्यभर दौरे करत आहेत, मेळावे आणि सभा घेत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख अजित पवार याबाबतीत आघाडीवर असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. 'लाडकी बहीण योजने'च्या प्रचारासाठी ते राज्यभर फिरत आहेत.**

दरम्यान, अजित पवार राज्याचे पुढचे मुख्यमंत्री होतील असे दावे अजित पवारांच्या पक्षातील नेते करत आहेत. मात्र महायुतीने अद्याप त्यांचा महायुतीचा चेहरा कोण असेल ते ठरवलेलं नाही. विधानसभेच्या निवडणुकीनंतर अजित पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार का? महायुतीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला कसा असेल? मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय कोणत्या आधारावर घेणार? जागांच्या आधारावर की स्ट्राईक रेटचा विचार करून निर्णय घेतला जाणार? अजित पवार गटाने महायुतीमध्ये किती जागांची मागणी केली आहे आणि अजित पवार गटाला विधानसभेच्या एकूण किती जागा



मिळतील? अशा काही प्रश्नांची अजित पवार यांनी उत्तरं दिली आहेत.राज्यातील सर्वच पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. विविध पक्षांचे नेते राज्यभर दौरे करत आहेत, मेळावे आणि सभा घेत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख अजित पवार याबाबतीत आघाडीवर असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. 'लाडकी बहीण योजने'च्या प्रचारासाठी ते राज्यभर फिरत आहेत. दरम्यान, अजित पवार राज्याचे पुढचे मुख्यमंत्री होतील असे दावे अजित पवारांच्या पक्षातील नेते करत आहेत. मात्र महायुतीने अद्याप त्यांचा महायुतीचा चेहरा कोण असेल ते ठरवलेलं नाही. विधानसभेच्या निवडणुकीनंतर अजित पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार का? महायुतीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला कसा असेल?

### लोकांची नाराजी कशी दूर करणार?

इच्छुक उमेदवारांना उमेदवारी मिळाली नाही तर तुम्ही त्यांची नाराजी कशी दूर करणार? त्यावर अजित पवार म्हणाले, एखादी जागा भाजपाला मिळाली आणि तिथले आमचे पदाधिकारी नाराज असतील तर त्यांची समजूत काढण्याचं काम अजित पवारचं असेल. एखादी जागा आम्हाला मिळाली आणि तिथे भाजपाचा पदाधिकारी नाराज असेल तर त्या पदाधिकाऱ्याची समजूत काढण्याचं काम देवेंद्र फडणवीस यांना करावा लागेल. त्याचप्रमाणे जिथे आम्हाला किंवा भाजपाला जागा मिळेल आणि तिथे शिवसेनेच्या शिंदे गटाचा

# लाडूच्या विक्रीवर परिणाम नाही!

## तिरुपती देवस्थान मंदिरातून 14 लाखांपेक्षा जास्त लाडूंची विक्री

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**तिरुमला तिरुपती देवस्थान येथे प्रसाद म्हणून देण्यात येणाऱ्या लाडूंमध्ये जनावरांची चरबी वापरली गेल्याचा आरोप आंध्र प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला होता. त्यांच्या या आरोपानंतर मोठा वाद निर्माण झाला आहे. यावरून आंध्रप्रदेशातील राजकीय वातावरणही चांगलंच तापलं आहे. मात्र, या वादाचा लाडूच्या विक्रीवर कोणताही परिणाम झाला नसल्याचे पुढे आलं आहे.**





### प्रसादाचे लाडू 15 दिवस टिकतात

महत्त्वाचे म्हणजे हा वाद निर्माण होण्यापूर्वी दिवसाला सरासरी ३.५० लाख लाडूंची विक्री होत होती. तीच आता कायम आहे, असं मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.यासंदर्भात भाविकांना विचारलं असता, आमची तिरुपती बालाजीवर अपार श्रद्धा आहे. अशा गोष्टींमुळे आमचा विश्वास डळमळीत होणार नाही. हा वाद आता जुना झाला आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या बातमीनुसार, तिरुमला तिरुपती देवस्थानकडून दररोज तीन लाख लाडू बनविले जातात. या लाडूच्या विक्रीमधून देवस्थानाला वर्षाकाठी ५०० कोटींचा महसूल मिळतो. देवस्थानात दर्शन घेतल्यावर आणि मंदिराच्या बाहेर अनेक स्टॉल्सवर हे लाडू उपलब्ध असतात. जर व्यवस्थित पॅकिंग केल्यास हे प्रसादाचे लाडू १५ दिवस टिकतात.

एनडीटीव्हीने मंदिर प्रशासनाच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, गेल्या चार दिवसांत तिरुमला तिरुपती देवस्थान मंदिरातून १४ लाखांपेक्षा जास्त लाडूंची विक्री झाली आहे. १९ सप्टेंबर रोजी एकूण ३.५९ लाख, २० सप्टेंबर रोजी ३.१७ लाख, २१ सप्टेंबर रोजी ३.६७ लाख, तर २२ सप्टेंबर रोजी ३.६० लाख लाडूंची विक्री झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे हा वाद निर्माण होण्यापूर्वी दिवसाला सरासरी ३.५० लाख लाडूंची विक्री होत होती. तीच आता कायम आहे, असं मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.यासंदर्भात भाविकांना विचारलं असता, आमची तिरुपती बालाजीवर अपार श्रद्धा आहे. अशा गोष्टींमुळे आमचा विश्वास डळमळीत होणार नाही. हा वाद आता जुना झाला आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या बातमीनुसार, तिरुमला तिरुपती देवस्थानकडून दररोज तीन लाख लाडू बनविले जातात. एनडीटीव्हीने मंदिर प्रशासनाच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, गेल्या चार दिवसांत तिरुमला तिरुपती देवस्थान मंदिरातून १४ लाखांपेक्षा जास्त लाडूंची विक्री झाली आहे.

१९ सप्टेंबर रोजी एकूण ३.५९ लाख, २० सप्टेंबर रोजी ३.१७ लाख, २१ सप्टेंबर रोजी ३.६७ लाख, तर २२ सप्टेंबर रोजी ३.६० लाख लाडूंची विक्री झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे हा वाद निर्माण होण्यापूर्वी दिवसाला सरासरी ३.५० लाख लाडूंची विक्री होत होती. तीच आता कायम आहे, असं मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.यासंदर्भात भाविकांना विचारलं असता, आमची तिरुपती बालाजीवर अपार श्रद्धा आहे. अशा गोष्टींमुळे आमचा विश्वास डळमळीत होणार नाही. हा वाद आता जुना झाला आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या बातमीनुसार, तिरुमला तिरुपती देवस्थानकडून दररोज तीन लाख लाडू बनविले जातात. या लाडूच्या विक्रीमधून देवस्थानाला वर्षाकाठी ५०० कोटींचा महसूल मिळतो. देवस्थानात दर्शन घेतल्यावर आणि मंदिराच्या बाहेर अनेक स्टॉल्सवर हे लाडू उपलब्ध असतात. जर व्यवस्थित पॅकिंग केल्यास हे प्रसादाचे लाडू १५ दिवस टिकतात. तिरुपती बालाजी ट्रॅव्हल्सने दिलेल्या माहितीनुसार, तीन आकारमानाच्या प्रकारात लाडू उपलब्ध होतात. या लाडूच्या विक्रीमधून देवस्थानाला वर्षाकाठी ५०० कोटींचा महसूल मिळतो. देवस्थानात दर्शन घेतल्यावर आणि मंदिराच्या बाहेर अनेक स्टॉल्सवर हे लाडू उपलब्ध असतात. जर व्यवस्थित पॅकिंग केल्यास हे प्रसादाचे लाडू १५ दिवस टिकतात. तिरुपती बालाजी ट्रॅव्हल्सने दिलेल्या माहितीनुसार, तीन आकारमानाच्या प्रकारात लाडू उपलब्ध होतात. लहान, मध्यम आणि मोठ्या आकाराचे लाडू मिळतात. त्याचा आकार अनुक्रमे ४० ग्रॅम, १७५ ग्रॅम आणि ७५० ग्रॅम इतका असतो. श्री वेंकटेश्वर मंदिराच्या आतमध्ये छोट्या आकाराचे लाडू भाविकांना प्रसाद म्हणून मोफत वाटले जातात. तर मध्यम आकाराचे लाडू प्रति नग ५० रुपये आणि मोठ्या आकाराचा लाडू प्रति नग २०० रुपयांना विकला जातो.

# कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्यांच्या अडचणीत वाढ

## जमीन गैरव्यवहार प्रकरणात न्यायालयाने दिला 'हा' निर्णय

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी (MUDA) द्वारा करण्यात आलेल्या जमीन अधिग्रहण प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे आरोप होत आहेत. या प्रकरणातील आरोप सिद्धरामय्या यांनी फेटाळून लावले आहेत. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या प्रकरणात गैरव्यवहार करून त्यांच्या पत्नीला लाभ मिळवून दिल्याचा आरोप विरोधकांनी केलेला आहे.**



### MUDA प्रकरण नेमकं काय आहे?

ते चौकशीचे आदेश देऊ शकतात. राज्यपालांना वैयक्तिक अधिकाराच्या आधारे गुन्हा नोंदवण्याची परवानगी देण्याचा अधिकार आहे२०२१ मध्ये MUDA च्या विकासासाठी केसर नावाच्या गावात तीन एकर जमिनीचं अधिग्रहण करण्यात आलं होतं. त्यानंतर मैसूर येथील विजयनगर या शहरातील जमिनी पुन्हा अधिग्रहीत करण्यात आल्या. आता या प्रकरणात याचिकाकर्त्यांनी हा दावा केला आहे की ज्या जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या त्याचं बाजारमूल्य हे जास्त होतं. मात्र, आम्हाला त्याचा मोबदला कमी प्रमाणात दिला.

या आरोपानंतर विरोधकांनी सरकारला चांगलंच धारेवर धरलं आहे.मात्र, यानंतर राज्यपालांच्या निर्णयाच्याविरोधात मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर कर्नाटक उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने दोन्हीकडील बाजू ऐकून घेतल्या. त्यानंतर राज्यपालांच्या निर्णयाला आव्हान देणारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांची याचिका मंगळवारी (२४ सप्टेंबर) कर्नाटक उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. त्यामुळे आता मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.दरम्यान, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणी दरम्यान कर्नाटक उच्च न्यायालयाने महत्त्वाचं निरीक्षण नोंदवलं.न्यायालयाने म्हटलं की, "राज्यपाल स्वतंत्र निर्णय घेऊ शकतात.

# 40 वर्षांची कतरीना



कतरिना कैफ तिच्या 40 व्या वाढदिवसाच्या एक दिवस आधी पती विकी कौशलसोबत सुट्टीसाठी निघाली आहे. नुकतेच दोघेही मुंबई विमानतळावर स्पॉट झाले होते, ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये दोघेही एकमेकांचा हात धरताना दिसत आहेत. विमानतळावर कतरिना फ्लोरल टॉप आणि डेनिम जीन्समध्ये दिसली. पांढऱ्या शूज आणि काळ्या गॉगलसह तिने या लुकला पूर्ण केले.. त्याचवेळी विकी पांढऱ्या टी-शर्टसह काळ्या ट्रॅकसूटमध्ये दिसला. यादरम्यान दोघांनी पापाराझींना एकत्र पोजही दिली. व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना एका चाहत्याने लिहिले की, 'कतरिना कैफ खूप सुंदर आहे.' आणखी एका युजरने लिहिले, 'बॉलिवुडमधील सर्वात सुंदर जोडप्यांपैकी एक'. तिसऱ्याने लिहिले, 'वाह दोघ छान दिसत आहेत'. कमेंट करताना आणखी एका यूजरने लिहिले की, 'एक नंबर जोडी लगती है इंकी'. कतरिना कैफ लवकरच ॲक्शन-थ्रिलर चित्रपट टायगर 3 मध्ये सलमान खानसोबत दिसणार आहे. याशिवाय तिच्याकडे विजय सेतुपतीसोबत श्रीराम राघवनचा मेरी ख्रिसमस हा चित्रपट आहे. चाहत्यांना तो फरहान अख्तरच्या 'जी ले जरा' या चित्रपटात आलिया भट्ट आणि

# पूजा भट्टचा चढला पारा

बिग बॉस ओटीटीचं दुसरं पर्व चांगलंच चर्चेत आहे. प्रत्येक आठवड्याला सदस्यांमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणामुळे भांडणं पाहायला मिळतं आहेत. अलीकडेच घरात आशिका भाटिया व एल्विश यादव यांची वाइल्ड कार्ड एंट्री झाली आहे. एल्विशनं घरात येताच आपला खेळ दाखवण्यास सुरुवात केली आहे. त्यानं अविनाशला निशाणा बनवलं आहे. या दरम्यान पूजा भट्ट व जिया शंकरमध्ये कडाक्याचं भांडणं झालं आहे. पूजानं जियावर अनेक गंभीर आरोपही केले आहेत. बिग बॉसनं घरातील सदस्यांना एक टास्क दिला होता. ज्यानंतर पूजा भट्ट फलक नाजला समजवू लागली की, "तू जियापासून दूर राहा. प्रत्येक आठवड्याला जियाची मैत्री बदलते. पहिल्यांदा ती एखाद्या सदस्याशी चांगली मैत्री करते आणि नंतर त्यालाच नॉमिनेट करते. त्याच्याशीच भांडते, मग क्षणार्धात लहान मुलांसारखं वागवून त्या सदस्याला समजवते. जेव्हा तिला असं वाटतं ती कॉर्नर होतेय, तेव्हा ती रडायला सुरुवात करते.पूजा एवढ्यावरच थांबत नाही. ती बेडरुममध्ये जाऊन अविनाश, फलक आणि जदच्या समोर जियाची पोलखोल करते. जिया सर्व सदस्यांचा वापर करून घेत असल्याचा आरोप पूजा करते. ती म्हणते की, "जिया ही स्वतःनुसार प्रत्येक सदस्याचा वापर करते. त्यानंतर त्याच्या मागून वाईट गोष्टी बोलत असते. ती टॉक्सिक (विषारी) आहे. ती समोरच्या व्यक्तीला उसकवते, मग त्याच्यात राग निर्माण करते. त्यानंतर ती व्यक्ती वाईट असल्याचं सांगत फिरते. हे सर्व ऐकून जियाचाही पार चढतो. जेव्हा ती पूजाला गप्प बसवायला जाते, तेव्हा पूजा तिला 'शटअप' बोलते. त्यानंतर ती म्हणते की, "तू फलकबरोबर काय खेळतेस ते खेळ. तिला चांगली बाजू दाखवं. तू मला मूर्ख बनवू शकत नाही. अभिषेकबरोबर चांगली राहिलीस, त्यानंतर त्यालाच शिव्या घातल्या.

# तमन्नाचा डान्स




तमन्ना भाटिया अलीकडेच प्राइम व्हिडीओच्या 'जी करदा' या वेब सीरिजमध्ये दिसली होती. मालिकेच्या प्रीमियरला एक महिना उलटूनही या मालिकेला चाहत्यांकडून भरभरून प्रेम आणि दाद मिळत आहे. दरम्यान, या मालिकेच्या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी अभिनेत्री मुंबईतील आर.डी. नॅशनल कॉलेजमध्ये पोहोचली होती. यादरम्यान सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये तमन्ना ढोल-ताशांवर नाचताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये तमन्ना ग्रीन प्रिंटेड को-ऑर्डर सेटमध्ये दिसली होती. मॅचिंग जॅकेटसोबत मॅचिंग पॅन्टमध्ये ती स्टायलिश दिसली. यावेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयीन दिवसांच्या आठवणी सांगितल्या आणि उपस्थित विद्यार्थ्यांशी संवादही साधला. या कार्यक्रमात अभिनेत्री म्हणाली- 'जी करदा'साठी आम्हाला मिळालेले प्रेम आणि कौतुक पाहून मी खूप आनंदी आणि उत्साहित आहे. लावण्याचे पात्र साकारणे खूप छान होते, मी माझ्या कॉलेजमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांसोबत हा क्षण साजरा करत आहे हे मला खूप आवडते. हा एक अद्भुत प्रवास आहे आणि या सुंदर अनुभवाचा भाग असलेल्या प्रत्येकाचे मनापासून आभार. या मालिकेचे दिग्दर्शन अरुणिमा शर्मा यांनी केले आहे. 'जी करदा'मध्ये तमन्ना भाटिया, आशिम गुलाटी, सुहेल नय्यर, अन्या सिंग, हुसैन दलाल, सायन बॅनर्जी आणि सामवेदना सुवाल्का यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# दिलदार भाईजान!

बॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता सलमान खान हा त्याच्या चित्रपटांमुळे नेहमीच चर्चेत असतो मात्र त्याही पेक्षा जास्त तो त्याच्या उदारतेसाठी आणि लोकांना मदत करण्यासाठी ओळखला जातो. एकदाच नव्हे तर अनेक वेळा सलमान खान हा बऱ्याच बॉलिवूड कलाकारांच्या मदतीला धावून गेला आहे. त्यामुळेच त्याला भाईजानही म्हटलं जातं. तो सर्वांची मदत करण्यासाठी नेहमीच तयार असतो. याचाच प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. ब्रेन स्ट्रोकने त्रस्त असलेल्या राहुल रॉयची मदत भाईजानने केली आहे. राहुल रॉयच्या हॉस्पिटलचे बिल सलमान खानने भरल्याचा खुलासा खुद्द राहुल रॉय आणि त्याच्या बहिणीने केला आहे. 'आशिकी' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारा राहुल रॉय याला 2020 मध्ये ब्रेन स्ट्रोक आला होता. त्यावेळी लडाखमध्ये त्याच्या 'LAC - लिव्ह द बॅटल' चित्रपटाच्या शूटिंग सुरु होतं. त्यावेळी राहुलला एअरलिफ्ट करावं लागलं आणि मुंबईतील नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. राहुलनं सांगितलं की, या ब्रेन स्ट्रोक तो हॉस्पिटल बरेट दिवस होता आणि त्यावेळी हॉस्पिटलचे बिल सलमान खानने भरले होते.



# मीना कुमारीचा बायोपिक



फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा दिग्दर्शक म्हणून पदार्पण करणार आहे. मनीष मल्होत्रा प्रसिद्ध अभिनेत्री मीना कुमारीच्या बायोपिकमधून पदार्पण करणार आहे. या चित्रपटात मीना कुमारीची भूमिका कृती सेनन साकारणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार या चित्रपटाची निर्मिती भूषण कुमारची टी-सीरीज करणार आहे. सध्या हा चित्रपट स्क्रिप्टिंगच्या टप्प्यात आहे. मात्र, अद्याप या चित्रपटाबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.मीना कुमारी यांचे खरे नाव महजबीन बानो होते. तीन दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी जवळपास ९० चित्रपटांमध्ये काम केले. मीना कुमारी यांनी बैजू बावरा, परिणीता, साहिब बीबी और गुलाम आणि काजल या चित्रपटांसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री श्रेणीमध्ये 4 फिल्मफेअर पुरस्कार जिंकले. बालकलाकार म्हणून त्यांनी इंडस्ट्रीत पदार्पण केले. मीना कुमारी यांनी विनय भट्ट प्रॉडक्शन अंतर्गत लेदर फेस, अधुरी कहानी, पूजा या चित्रपटांमध्येही काम केले. मीना कुमारीला ट्रॅजेडी क्वीन म्हटले जाते. त्यांचे जीवन अडचणींनी भरलेले होते. त्यांच्या जन्मामुळे त्यांचे वडील इतके निराश झाले की त्यांनी त्यांना अनाथाश्रमात सोडले. वयाच्या 13 व्या वर्षी आईचे निधन झाले, चित्रपटाच्या सेटवरही शोषण झाले. वैवाहिक जीवनातही पतीच्या मारहाणीला कंटाळून मीना दारू प्यायच्या. मीना कुमारी सेटवर शूटिंग करताना रडण्यासाठी ग्लिसरीनचा वापर करत नसल्याचं म्हटलं जातं. अलीकडेच आदिपुरुष या चित्रपटात क्रिती सेनन सीतेच्या भूमिकेत दिसली होती. क्रिती लवकरच करीना कपूर खान आणि तब्बूसोबत 'द क्रू' या चित्रपटात दिसणार आहे.

# बासितने पाकिस्तान बोर्डाला फटकारले!

## भारतात पाकिस्तानसारखी व्यवस्था नाही—बासित अली

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

**भारताने रविवारी बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात २८० धावांनी दणदणीत विजय नोंदवला. चेन्नईच्या मैदानावर भारताने ५१५ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करायला उतरलेल्या बांगलादेशला रोहित ब्रिगेडने सामन्याच्या चौथ्या दिवशी २३४ धावांत गुंडाळले. चौथ्या डावात फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने ६ आणि रवींद्र जडेजाने तीन विकेट्स घेतले. भारताच्या विजयानंतर पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू बासित अलीने पीसीबीवर टीका केली आहे. तो रागाने म्हणाला की आमच्या इथे अज्ञानी लोक आहेत. ज्यांना खेळपट्टीचे महत्त्व माहित नाही.**



आपल्या यूट्यूब चॅनलवर बोलताना बासित अली म्हणाला, “जसप्रीत बुमराहने संपूर्ण सामन्यात पाच विकेट्स घेतल्या. अश्विनने सहा, जडेजाने पाच तर मोहम्मद सिराज आणि आकाश दीपने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अशा प्रकारे भारतीय गोलंदाजांनी एकूण २० विकेट्स घेतल्या. कारण त्यांच्या गोलंदाजांनी आपापले काम चोखपणे पार पाडले. चौथ्या डावात चेंडू वळणार हे टीम इंडियाला माहित होते. म्हणून त्यांनी फक्त दोन फिरकीपटू उतरवले. याचे श्रेय पिच क्युरेटरला जाते. अशी खेळपट्टी कशी बनवायची ज्यावर कसोटी खेळली जाते आणि विजयी होता येते, हे त्यांना माहीत आहे. त्यांची व्यवस्था आपल्यासारखी नाही.बासित अली पुढे म्हणाला, “आपल्या देशात खेळपट्टीला महत्त्व नसते, असे म्हटले जाते. कारण ते अज्ञानी लोक आहेत. हे सामान उचलून क्रिकेट खेळणारे लोक आता क्रिकेट बोर्ड चालवत आहेत. त्यामुळे मला राग येतो. या मुलांना ते काय बोध देत आहेत? खेळपट्टी समजून घेतल्यावरच पन्नास टक्के प्रश्न सुटतो. सुनील गावसकर आणि जावेद मियांदाद यांना खेळपट्टी समजून घेण्याचे महत्त्व विचारा. जर तुम्ही खेळपट्टी समजून घेतली तर तुमच्यासाठी गोष्टी सोप्या होतात. पण इथल्या लोकांना यावर विश्वास नाही.”बासित अली पुढे म्हणाला, “आपल्या देशात खेळपट्टीला महत्त्व नसते, असे म्हटले जाते. कारण ते अज्ञानी लोक आहेत. हे सामान उचलून क्रिकेट खेळणारे लोक आता क्रिकेट बोर्ड चालवत आहेत. त्यामुळे मला राग येतो. या मुलांना ते काय बोध देत आहेत? खेळपट्टी समजून घेतल्यावरच पन्नास टक्के प्रश्न सुटतो. सुनील गावसकर आणि जावेद मियांदाद यांना खेळपट्टी समजून घेण्याचे महत्त्व विचारा. जर तुम्ही खेळपट्टी समजून घेतली तर तुमच्यासाठी गोष्टी सोप्या होतात. पण इथल्या लोकांना यावर विश्वास नाही.”आपल्या यूट्यूब चॅनलवर बोलताना बासित अली म्हणाला, “जसप्रीत बुमराहने संपूर्ण सामन्यात पाच विकेट्स घेतल्या. अश्विनने सहा, जडेजाने पाच तर मोहम्मद सिराज आणि आकाश दीपने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अशा प्रकारे भारतीय गोलंदाजांनी एकूण २० विकेट्स घेतल्या. कारण त्यांच्या गोलंदाजांनी आपापले काम चोखपणे पार पाडले. चौथ्या डावात चेंडू वळणार हे टीम इंडियाला माहित होते. म्हणून त्यांनी फक्त दोन फिरकीपटू उतरवले. याचे श्रेय पिच क्युरेटरला जाते. अशी खेळपट्टी कशी बनवायची ज्यावर कसोटी खेळली जाते आणि विजयी होता येते, हे त्यांना माहीत आहे. त्यांची व्यवस्था आपल्यासारखी नाही.बासित अली पुढे म्हणाला, “आपल्या देशात खेळपट्टीला महत्त्व नसते, असे म्हटले जाते. कारण ते अज्ञानी लोक आहेत. हे सामान उचलून क्रिकेट खेळणारे लोक आता क्रिकेट बोर्ड चालवत आहेत. त्यामुळे मला राग येतो. या मुलांना ते काय बोध देत आहेत? खेळपट्टी समजून घेतल्यावरच पन्नास टक्के प्रश्न सुटतो. सुनील गावसकर आणि जावेद मियांदाद यांना खेळपट्टी समजून घेण्याचे महत्त्व विचारा. जर तुम्ही खेळपट्टी समजून घेतली तर तुमच्यासाठी गोष्टी सोप्या होतात. पण इथल्या लोकांना यावर विश्वास नाही.”बासित अली पुढे म्हणाला, “आपल्या देशात खेळपट्टीला महत्त्व नसते, असे म्हटले जाते. कारण ते अज्ञानी लोक आहेत. आपल्या यूट्यूब चॅनलवर बोलताना बासित अली म्हणाला, “जसप्रीत बुमराहने संपूर्ण सामन्यात पाच विकेट्स घेतल्या. अश्विनने सहा, जडेजाने पाच तर मोहम्मद सिराज आणि आकाश दीपने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अशा प्रकारे भारतीय गोलंदाजांनी एकूण २० विकेट्स घेतल्या. कारण त्यांच्या गोलंदाजांनी आपापले काम चोखपणे पार पाडले. चौथ्या डावात चेंडू वळणार हे टीम इंडियाला माहित होते. म्हणून त्यांनी फक्त दोन फिरकीपटू उतरवले.

### गोलंदाजांनी 20 विकेट्स घेतल्या

आपल्या यूट्यूब चॅनलवर बोलताना बासित अली म्हणाला, “जसप्रीत बुमराहने संपूर्ण सामन्यात पाच विकेट्स घेतल्या. अश्विनने सहा, जडेजाने पाच तर मोहम्मद सिराज आणि आकाश दीपने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अशा प्रकारे भारतीय गोलंदाजांनी एकूण २० विकेट्स घेतल्या. कारण त्यांच्या गोलंदाजांनी आपापले काम चोखपणे पार पाडले. चौथ्या डावात चेंडू वळणार हे टीम इंडियाला माहित होते. म्हणून त्यांनी फक्त दोन फिरकीपटू उतरवले. याचे श्रेय पिच क्युरेटरला जाते. अशी खेळपट्टी कशी बनवायची ज्यावर कसोटी खेळली जाते आणि विजयी होता येते, हे त्यांना माहीत आहे.

# गावसकर यांच्याकडून भूखंड का काढून घेतला?

## जागतिक दर्जाची अकादमी उभारण्यासाठी रहाणेला दिली जमीन

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईतील पॉश वांद्रे परिसरात जागतिक दर्जाचे क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेला २,००० चौरस मीटर जमीन भाडेतत्त्वावर देण्यास महाराष्ट्र मंत्रिमंडळाने सोमवारी मंजुरी दिली आहे. १९८८ मध्ये महान क्रिकेटपटू सुनील गावसकर यांना इनडोअर ट्रेनिंग अकादमी स्थापन करण्यासाठी हा भूखंड देण्यात आला होता. याबाबत अजिंक्य रहाणेने एक्सवर पोस्ट शेअर करत माहिती दिली.**



इनडोअर क्रिकेट ट्रेनिंग अकादमी विकसित करण्यासाठी ३६ वर्षांपूर्वी गावसकर यांना प्रथम भूखंड वाटप करण्यात आला होता, असे कॅबिनेट नोटमध्ये म्हटले आहे. विकासाअभावी शासनाने हा भूखंड परत माघारी घेतली. झोपडपट्टीतील रहिवासी अयोग्य कारणांसाठी भूखंड वापरत असल्याने हा भूखंड वाईट अवस्थेत असल्याचे सरकारने म्हटले आहे.अत्याधुनिक क्रीडा सुविधा विकसित करण्यासाठी क्रिकेटपटू अजिंक्य मधुकर रहाणेला ३० वर्षांच्या लीजवर जमीन देण्याच्या महसूल विभागाच्या प्रस्तावाला महाराष्ट्र मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. हा भूखंड रहाणे यांना भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव म्हाडा (महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण) कडून मंजूर करण्यात आला होता, त्याला मंत्री मंडळाच्या परिषदेने मंजुरी दिली. प्राइम लोकेशन असूनही तिथे चांगली क्रिकेट अकादमी बांधली गेली नाही. गावसकर यांनी भारतासाठी १२५ कसोटी आणि १०८ एकदिवसीय सामन्यांमध्ये अनुक्रमे १०१२२ आणि ३०९२ धावा केल्या.

### रहाणेने एक्सवर पोस्ट शेअर केली

मुंबईतील पॉश वांद्रे परिसरात जागतिक दर्जाचे क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेला २,००० चौरस मीटर जमीन भाडेतत्त्वावर देण्यास महाराष्ट्र मंत्रिमंडळाने सोमवारी मंजुरी दिली आहे. १९८८ मध्ये महान क्रिकेटपटू सुनील गावसकर यांना इनडोअर ट्रेनिंग अकादमी स्थापन करण्यासाठी हा भूखंड देण्यात आला होता. याबाबत अजिंक्य रहाणेने एक्सवर पोस्ट शेअर करत माहिती दिली.